# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
## दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.बासाकोकृवि/आस्था/अ–३/ २६५८ /२०१९ दिनांक :– 30 MAR 2019

वाचा :– १) शासन निर्णय क्र. सीएफआर–१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक २ फेब्रुवारी, २०१७.
२) शासन निर्णय क्र. सीएफआर–१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८.
३) शासन निर्णय क्र. सीएफआर–१२१८/प्र.क्र.८/तेरा, दिनांक ५ मार्च, २०१८.

# परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्र. ४७/२०१०/तेरा, दिनांक ०१/११/२०११ अन्वये एकत्रित सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये गट–अ ते गट–क संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कार्यमुल्यमापन अहवालांचे सुधारित नमुने विहित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये आणि योजनांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, अ.क्र. २ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार **गट–अ आणि गट–ब संवर्गातील शासकीय अधिकारी म्हणजेच या विद्यापीठातील संचालक, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, कुलसचिव, नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव/ सहाय्यक नियंत्रक यांचेसाठी परिशिष्ट–अ प्रपत्र–१ मधील कार्यमुल्यमापन अहवाल वापरण्यात यावेत.** **(परिशिष्ट–१)**

संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार **तांत्रिक सेवांमधील अधिकाऱ्यांसाठी कार्यमुल्यमापन अहवालाचा स्वतंत्र नमुना ( विद्यापीठात कार्यरत प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक व तत्सम संवर्ग यांच्याकरिता ) 'परिशिष्ट–अ' प्रपत्र–६** अन्वये विहित करण्यात आला आहे. **(परिशिष्ट–२)**

संदर्भाधीन अ.क्र. २ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार **'गट–ब आणि गट–क' मधील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी परिशिष्ट–अ प्रपत्र–२** मधील नमुन्यात 'कार्यमुल्यमापन अहवाल' वापरण्यात यावेत. **(परिशिष्ट–३)**

**उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार परिशिष्ट – १, २, ३ कार्यमुल्यमापन अहवालाचे नमुने www.dbskkv.org या विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.** कार्यालय प्रमुखांनी सदर नमुन्यांच्या छायांकित प्रती आपल्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना पुरविण्यात याव्यात व सन २०१८–१९ पासून विहित नमुन्यात कार्यमुल्यमापन अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावेत. सर्व प्रतिवेदन आणि पुनर्विलोकन अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ मधील 'परिशिष्ट–ब' अन्वये 'कार्यमुल्यमापन अहवाल' लिहिण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना विहित करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यात यावेत.

शासन निर्णय क्र. सीएफआर–१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर, २०११ मधील वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल विहित मुदतीत या कार्यालयास सादर करण्यात यावेत. गोपनीय अहवाल सादर करण्यास विलंब होणार नाही असे पहावे.

सर्व प्रतिवेदन आणि पुनर्विलोकन अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे आणि वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल विहित मुदतीत म्हणजेच १५ मे, २०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

Charan

कुलसचिव,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**प्रत माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

१. शिक्षण संचालक/संशोधन संचालक/संचालक, विस्तार शिक्षण/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता/उपकुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली/वनशास्त्र महाविद्यालय, दापोली/कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली/मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी/उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे/काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, रोहा/निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
३. विभाग प्रमुख, ........................................ विभाग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
४. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला/प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत.
५. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
६. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, रत्नागिरी.
७. प्राचार्य, मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी.
८. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, रत्नागिरी.
९. कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, रत्नागिरी.
१०. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, आवाशी, ता.खेड.
११. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, लांजा/रोहा.
१२. उद्यानविद्यावेत्ता, आंबा संशोधन केंद्र, रामेश्वर, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग.
१३. कृषिविद्यावेत्ता, कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग.
१४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, मुळदे.
१५. प्रभारी अधिकारी, पशुपैदास प्रक्षेत्र, निळेली.
१६. प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, ता.रायगड.
१७. प्रभारी अधिकारी, अन्विक्षा–नि–प्राप्त्यक्षिक प्रक्षेत्र, रेपोली, जि.रायगड.
१८. खार जमीन शास्त्रज्ञ, खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि.रायगड.
१९. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि.ठाणे.
२०. संशोधन अधिकारी, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२१. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा / रोहा.
२२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती कार्यशाळा, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२३. सहाय्यक कुलसचिव (प्रशा–२), डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२४. सहाय्यक नियंत्रक १/२, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२५. अधिदान व लेखाधिकारी, पू.ले.प.प., (१/२/३/४) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली/ प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत/ मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी/ प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला.
२६. सर्व शाखा कुलगुरु कार्यालय, दापोली ........................................
२७. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.